31 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

उद्योग-विद्यापीठ सहकार्यातून विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी : कुलगुरु डॉ.राजनीश कामत

कोल्हापूर/प्रतिनिधी :

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे, आजच्या शिक्षणप्रणालीत अभिप्रेत आहे. विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक क्षमता आणि उद्योगक्षेत्रातील व्यावहारिक अनुभव यांची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह संशोधनालाही नवी दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि पुणे येथील ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रीज प्रा. लि. यांच्यात काल झालेल्या सामंजस्य करारावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ते म्हणाले, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, प्रात्यक्षिक अनुभव आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बदलत्या औद्योगिक गरजा आणि रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्राचा अनुभव मिळाल्यास त्यांची व्यावसायिक तयारी अधिक सक्षम होण्यास मदत होईल. तसेच, विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे ज्ञानाचे व्यावहारिक उपयोगात रूपांतर करण्याच्या संधीही वाढतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी विविध संस्था, उद्योग आणि संशोधन केंद्रांशी सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. अशा सहकार्यातून ज्ञानाची देवाणघेवाण, संशोधनाला व्यावहारिक दिशा आणि परस्पर सहकार्याच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

ग्रीन सोल्युशन्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवाळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. उद्योगक्षेत्रातील अनुभव आणि विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक कौशल्य यांच्या परस्परपूरक वापरातून विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या आणि ज्ञानविस्ताराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, या दृष्टीने या सहकार्याला महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि श्री. अहिवाळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, ग्रीन सोल्युशन्सच्या आरती भोसले आणि विद्युलता पाटील उपस्थित होत्या.

15 PM
30 Oct Uday Kulkarni_261031_170756.jpg
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज व्हूज
31 OCT 2026

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

उदय कुलकर्णी यांच्या पत्रकारितेत 'नाही रे' वर्गाचे प्रतिबिंब : वासुदेव कुलकर्णी

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्हूज) :

दिवंगत ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी यांनी सातत्याने वंचित समूह घटकांचे प्रश्न मांडले. त्यांच्या पत्रकारितेमध्ये नेहमीच 'नाही रे' वर्गाचे प्रतिबिंब उमटत आले, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व संपादक वासुदेव कुलकर्णी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागामध्ये 'उदय कुलकर्णी यांची पत्रकारिता' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.



कुलकर्णी म्हणाले, ज्या ठिकाणी अन्याय असेल तिथे उदय कुलकर्णी जात असत. अन्यायग्रस्तांचे प्रश्न समजून घेऊन ते वर्तमानपत्राच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवत असत. देवदासी प्रथा, अंधश्रद्धा निर्मूलन, धरणग्रस्त आदी वंचित, दुर्लक्षित घटकांचे अनेक प्रश्न त्यांनी मांडले. त्यांची पत्रकारिता मूल्यांशी एकनिष्ठ होती. अनेक सामाजिक चळवळींना पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी पाठबळ दिले. पर्यावरण, निसर्ग संवर्धन आणि विज्ञान हे विषय नेहमीच त्यांच्या पत्रकारितेच्या केंद्रस्थानी राहिले. कोल्हापुरात प्रेस क्लबची स्थापना करण्यापासून ते नर्मदा बचाव आंदोलनापर्यंत अनेक उपक्रमांमध्ये आणि सामाजिक लढ्यांमध्ये उदय कुलकर्णी सक्रिय सहभागी होते.


ते म्हणाले, पत्रकारितेत तटस्थता हा गुण अत्यंत महत्त्वाचा असतो आणि तो उदय कुलकर्णी यांनी आयुष्यभर जपला. अनेक थोरामोठ्यांशी संबंध असले तरी हे संबंध त्यांनी बातमीदारीत कधीच येऊ दिले नाहीत. व्यक्तिगत मते आणि पत्रकारिता या दोन बाबी त्यांनी आयुष्यभर स्वतंत्र ठेवल्या, हे त्यांच्या पत्रकारितेचे वैशिष्ट्य आहे, असेही वासुदेव कुलकर्णी म्हणाले.

शोध पत्रकारितेची चर्चा अलीकडे केली जात आहे, परंतु ३५ वर्षांपूर्वी उदय कुलकर्णी यांनी कोल्हापुरात शोध पत्रकारिता केली होती. अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचे अत्यंत जवळचे संबंध होते. लोकांच्या प्रश्नांशी संबंधित लढणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आणि संस्था-संघटनाना ते बळ देत होते. त्यांची संपूर्ण पत्रकारिता ही लोकजीवनाशी एकरूप झालेली होती, असेही कुलकर्णी म्हणाले.

यावेळी निसर्ग मित्रचे अध्यक्ष अनिल चौगुले, दिलासा संस्थेच्या संचालिका डॉ. रूपा शहा, पत्रकार मतीन शेख आदींनी उदय कुलकर्णी यांच्याबाबतच्या भावना व्यक्त केल्या. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. उदय कुलकर्णी यांच्या भगिनी सविता देशपांडे आणि विद्या दाभाडे यांच्यासह पत्रकारिता अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, बाजीराव कांबळे, विलास पंदारे, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2026
सकाळ

उदय कुलकर्णी यांच्या पत्रकारितेत 'नाही रे' वर्गाचे प्रतिबिंब : वासुदेव कुलकर्णी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ पत्रकार वासुदेव कुलकर्णी.

कोल्हापूर : दिवंगत ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी यांनी सातत्याने वंचित समूह घटकांचे प्रश्न मांडले. त्यांच्या पत्रकारितेमध्ये नेहमीच 'नाही रे' वर्गाचे प्रतिबिंब उमटत आले, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार वासुदेव कुलकर्णी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागामध्ये 'उदय कुलकर्णी यांची पत्रकारिता' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. कुलकर्णी म्हणाले, 'पत्रकारितेत तटस्थता हा गुण महत्त्वाचा असतो आणि तो उदय कुलकर्णी यांनी आयुष्यभर जपला.' यावेळी निसर्ग मित्रचे अध्यक्ष अनिल चौगुले, दिलासा संस्थेच्या संचालिका डॉ. रूपा शहा, मतीन शेख आदींनी भावना व्यक्त केल्या. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. उदय कुलकर्णी यांच्या भगिनी सविता देशपांडे आणि विद्या दाभाडे, पत्रकारिता विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, बाजीराव कांबळे, विलास पंदारे, सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2026
सकाळ

विद्यापीठात मंगळवारपासून व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. ३० : आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि न्यायविषयक विचारविश्वाला न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी आकार दिला. त्यांच्या १२५व्या स्मृतिवर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे 'महादेव गोविंद रानडे : काळ आणि कर्तृत्व' या विषयावर तीन आणि चार नोव्हेंबरला व्याख्यानमाला होणार आहे.



गणितशास्त्र अधिविभागातील रामानुजन सभागृहात तीन नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता व्याख्यानमालेचे उद्घाटन होईल. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांचे 'न्यायमूर्ती रानडे आणि महाराष्ट्रातील प्रबोधन' या विषयावर, तर डॉ. नीरज हातेकर यांचे 'न्यायमूर्ती रानडे यांच्या आर्थिक विचारांची समकालीन प्रस्तुतता' या विषयांवर व्याख्यान होईल. यानंतर डॉ. भारती पाटील, रणधीर शिंदे, दत्तात्रय मचाले विचार मांडतील. चार रोजी डॉ. नागोराव कुंभार, अवनीश पाटील, नीलांबरी जगताप यांची व्याख्याने होतील.

दुपारच्या सत्रात डॉ. नंदकुमार मोरे, कृष्णा पाटील, सूर्यकांत गायकवाड विचार मांडतील. समारोप सत्रात डॉ. अशोक चौसाळकर यांचे 'न्यायमूर्ती रानडे यांचे धर्मविचार' या विषयावर व्याख्यान होईल, अशी माहिती डॉ. अवनीश पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2026

पुढारी

विद्यापीठात ३ नोव्हेंबरपासून रानडे विचारवेध व्याख्यानमाला

कोल्हापूर : न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या १२५ व्या स्मृतिवर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३ व ४ नोव्हेंबर रोजी 'महादेव गोविंद रानडे : काळ आणि कर्तृत्व' या विषयावर दोन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. गणितशास्त्र अधिविभागातील रामानुजन सभागृहात ही व्याख्यानमाला होईल. किशोर बेडकिहाळ, डॉ. नीरज हातेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. देवकुमार अहिरे, डॉ. दत्तात्रय मचाले यांच्यासह विविध मान्यवर व्याख्याते रानडे यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि न्यायविषयक विचारांचा वेध घेणार आहेत. दुसऱ्या दिवशी डॉ. नागोराव कुंभार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. कृष्णा पाटील आणि डॉ. सूर्यकांत गायकवाड विचार मांडतील. समारोप सत्रात डॉ. अशोक चौसाळकर यांचे व्याख्यान होईल. जिज्ञासूंनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

झेक प्रजासत्ताकच्या संशोधन केंद्र शिष्टमंडळाची शिवाजी विद्यापीठास भेट

कोल्हापूर/प्रतिनिधी :

झेक प्रजासत्ताकच्या इंटरनॅशनल न्यूरोडिजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरच्या (INDRC) प्रतिनिधींनी शिवाजी विद्यापीठाला भेट देऊन संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संभाव्य संधींबाबत चर्चा केली.

संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्य, ज्ञानाची देवाणघेवाण आणि आंतरविद्याशाखीय समन्वयाच्या माध्यमातून संशोधनाच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठास काल झेक प्रजासत्ताक येथील इंटरनॅशनल न्यूरोडीजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल आणि संस्थेचे एथिक्स अँड सिक्युरिटी मॅनेजर ललित पाटील यांनी भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत त्यांनी संशोधन क्षेत्रातील परस्पर सहकार्य, संस्थात्मक समन्वय आणि भविष्यातील सहकार्याच्या संभाव्य दिशांवर विचारविनिमय केला.

यावेळी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांसमवेत संवाद वाढविणे आणि विविध शैक्षणिक क्षेत्रांतील कौशल्यांचा परस्परपूरक उपयोग करण्याचे शिवाजी विद्यापीठाचे धोरण आहे. त्या दृष्टीने या संवादाला मोठे महत्त्व आहे.

विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संगणकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक तथा राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे उपस्थित होते. विविध शैक्षणिक विभागांतील प्रतिनिधींच्या सहभागामुळे या चर्चेला आंतरविद्याशाखीय सहकार्याचीही व्यापक पार्श्वभूमी लाभली. डॉ. सोनल चोंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 OCT 2026

पुढारी

पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेला नाट्यरसिकांची दिलखुलास दाद

चार महाविद्यालयांच्या एकांकिकांचे सादरीकरण; आज नऊ एकांकिकांची मेजवानी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोल्हापूरच्या नाट्यविश्वात महत्त्वाचे स्थान असलेल्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी नाट्यरसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे; गायन समाज देवल क्लब, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या सहआयोजनातून ही स्पर्धा होत आहे. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे सभागृहात १ नोव्हेंबरपर्यंत ही स्पर्धा सुरू राहणार आहे.

पहिल्या दिवशी चार महाविद्यालयांनी आपल्या एकांकिका सादर केल्या. यामध्ये शहाजी विधी महाविद्यालयाची 'साडेतीन हातांचा हिशेब', डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूटची 'पालखी', संभाजीराव कदम महाविद्यालयाची 'मॅडम' आणि डी. के. टी. ई., इचलकरंजीची 'रोमच्या सुताराची गोष्ट' या एकांकिकांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या अभिनयकौशल्याला आणि सादरीकरणाला प्रेक्षकांकडून दाद मिळाली.



कोल्हापूर : देवल क्लबमध्ये सुरू असलेल्या पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर रंगकर्मी.

स्पर्धेतील आजची नाटके

शनिवारी (३१ ऑक्टोबर) पहिल्या सत्रात सकाळी नऊपासून श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे आर्किटेक्चर महाविद्यालय 'नकाब', देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर 'शाब्बास पठ्ठे!', सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड 'छप्पर' आणि राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय 'ओॲसिस' या एकांकिका सादर करणार आहेत.

सायंकाळी चारपासून श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी 'द अनसीन व्हिजन, अशोकराव माने पॉलिटेक्निक, वाठार तर्फ वडगाव 'वाघ आला वाघ', शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाची 'मागचं दार', भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर-२ 'साठी' आणि डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटची 'आभास' या एकांकिका रंगणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 OCT 2026

लोकमत

'साडेतीन हातांचा हिशेब'ने स्पर्धेला प्रारंभ

पुरुषोत्तम करंडक



पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेला शुक्रवारी प्रारंभ झाला. यावेळी पालखी ही एकांकिका सादर करण्यात आली.
छाया : आदित्य वेल्हाळ

कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक अंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेला शुक्रवारी प्रारंभ झाला. साडेतीन हातांचा हिशेब, पालखी, म्याडम या एकांकिकांनी पहिला दिवस गाजविला. देवल क्लबच्या टेंबे रंगमंदिरात ही स्पर्धा होत आहे. महाराष्ट्रीय कलोपासक पुणे, गायन समाज देवल क्लब व शिवाजी विद्यापीठ यांच्या सहआयोजनातून स्पर्धा सुरू झाली. 'देवल'चे खजिनदार राजेंद्र पित्रे व रंगकर्मी सुबोध गद्रे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. शंकर जुनेजा, राजन ठाकूर-देसाई, सुनील घोरपडे, संग्राम भालकर, मनीषा आपटे उपस्थित होते.

पहिल्या दिवशी चार महाविद्यालयांनी एकांकिका सादर केल्या. त्यामध्ये शहाजी विधि महाविद्यालयाची 'साडेतीन हातांचा हिशेब', 'डी. वाय. पाटील'ची 'पालखी', संभाजीराव कदम महाविद्यालयाची 'म्याडम' आणि डी. के. टी. ई., इचलकरंजीची 'रोमच्या सुताराची गोष्ट' यांचा समावेश होता. आज, शनिवारी पहिल्या सत्रात प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या आर्किटेक्चर महाविद्यालयाची 'नकाब', रत्नाप्पा कुंभार कॉलेजची 'शाब्बास पठ्ठे!', कराडच्या गाडगे महाराज कॉलेजची 'छप्पर' व राजारामबापू अभियांत्रिकीची 'ओॲसिस' या एकांकिका सादर होणार आहेत. स्पर्धा उद्या रविवारपर्यंत चालणार आहेत. सोनाली मगर, श्रीनिवास एकसंबेकर व चंद्रशेखर कुलकर्णी हे परीक्षक आहेत. स्पर्धेची अंतिम फेरी दिवाळीनंतर पुण्यामध्ये होणार आहे.